**मा. मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर वाय जंक्शन मुंब्रा येथील उड्डाणपुलाचे झाले लोकार्पण.**

**वाय जंक्शन उड्डाणपूल अवजड वाहतुकीसाठी ठरेल फायदेशीर, वाहतूक वेळेत जवळपास ३०मिनिटांनी बचत होईल**

**दिनांक १३ नोव्हेंबर, २०२२:**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ हा ठाणे जिल्ह्याच्या शहरी भागातील एक महत्त्वाचा रस्ता आहे. हा महामार्ग मुंब्रा वाय जंक्शन, शिळफाटा - कल्याण फाटा जंक्शन या भागातून जात असल्यामुळे त्या भागाचा विकास होत आहे. मुंब्रा वाय जंक्शनवरील एमएमआरडीएने बांधलेल्या ३+३ अशा दुहेरी मार्गिकेच्या या उड्डाणपुलामुळे जेएनपीटीकडून येणारी अवजड वाहतूक आणि गुजरातकडे जाणारी वाहतूक विभक्त करते. त्यामुळे जेएनपीटी आणि गुजरातच्या सीमेवरून येणाऱ्या अवजड कंटेनरच्या वाहतुकीसाठी हा उड्डाणपूल उपयुक्त ठरेल.  तसेच मुंब्रा शहरातून येणाऱ्या स्थानिक वाहतुकीमुळे होणारी गर्दीदेखील टळेल.

**विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पुलाचे बांधकाम**

शिळफाटा, डोंबिवली/ कल्याण या भागांमधील विकासकामांमुळे निवासी संकुलामध्ये नागरी वाढ लक्षात घेता हा प्रकल्प ठरेल फायदेशीर. सदर प्रकल्पामध्ये रस्ता रुंदीकरणासह उड्डाणपूलाच्या बांधकामाचा अंतर्भाव आहे. सदर उड्डाणपुलाची एकूण लांबी पोहाचमार्गासह ८२० मी. असून रुंदी २४.२० मीटर (३+३ मार्गिका) इतकी आहे.

कार्यक्रमाच्या दरम्यान मा. मुख्यमंत्री सर्वांना संबोधित करताना म्हणाले "एमएमआरडीएच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या या  उड्डाणपुलाचा हजारो वाहनांना आणि लाखो प्रवाशांना फायदा  होणार असून प्रत्येक फेरीला त्यांच्या वेळेत सुमारे ३० मिनिटांची बचत होणार आहे. कल्याण डोंबिवली  महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्याचे रुंदीकरण व सुधारीकरण करण्याचे काम देखील लवकर सुरू होईल ज्यामुळे या भागातील नागरिकांना उत्तम दर्जाचे रस्ते मिळतील तसेच इतर विकास कामामुळे आयुष्य सुखकर होईल.

"या समारंभात बोलताना श्री श्री एस. व्ही.आर. श्रीनिवास भा.प्र.से., मा. महानगर आयुक्त म्हणाले, "या प्रकल्पामुळे लाखो लोकांना फायदा होईल कारण यामुळे मनुष्याचे तास कमी होतील, रहदारी कमी होईल, JNPT आणि गुजरातकडे जाणारी वाहतूक सुलभ होईल, कार्बन उत्सर्जन कमी होईल.मुंब्रा वाय जंक्शन प्रकल्पाने बाधित झालेल्या एकूण ८८६ प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे. विविध सेवा वाहिन्यांचे तसेच उच्च विदयुत दाबाच्या लाईनचे स्थलांतरण व जमिनीचे अधिग्रहण, इ. बाबींची पूर्तता केल्यानंतर प्रकल्प पूर्ण करणे शक्य झाले."


MMRDA
मुंबई महानगर प्रदेश विकास
राष्ट्रीय महामार्ग क्र.४
वाय जंक्शन मुंब्रा येथील
लोकार्पण सोहळा
रविवार दिनांक १३ नोव्हेंबर
दुपारी ०४.०० वाजता
शुभहस्ते
मा.ना.श्री. एकनाथ
मा.ना.श्री. देवेंद्र



